# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

## <u>जाहीर सूचना</u>

सार्वजनिक उद्दिष्टांसाठी राखीव असलेल्या महानगरपालिकेच्या जागेवरील समाजकल्याण केंद्राकरिता आरक्षित असलेल्या इमारती अनुज्ञा व अनुज्ञप्ती तत्वावर परिरक्षण व व्यवस्थापना करिता सार्वजनिक संस्थांना वाटप करण्यासंबंधीच्या धोरणांस सुधार समिती ठराव क्र. 172 दि. 20.02.2020 व महानगरपालिका ठराव क्र. 159 दि. 24.11.2020 अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदर धोरणानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या समाजकल्याण केंद्राकरिता आरक्षित असलेल्या बांधीव इमारती या विविध सार्वजनिक उद्दिष्टांसाठी जसे की, शिवणकामाचे प्रशिक्षण, अंतर्गत खेळ, प्रौढ शिक्षण अभियान, कुटुंब नियोजन कार्यक्रम, सांस्कृतिक, शैक्षणिक, स्त्री व मुलांचे संगोपनाचे कार्यक्रम, कल्याणकेंद्र, योगाभ्यासकेंद्र, विपश्यना केंद्र, कुटुंब कलहातील समुपदेशन, सामाजिक उद्दिष्टे इत्यादीकरिता वितरीत करता येतील. या अनुषंगाने खालील समाजकल्याण केंद्र मुंबईतील डबेवाले म्हणून सेवा देणा-या संस्थेस वितरित करण्याचे प्रस्ताविले आहे.

| जागेचा तपशील | बांधीव सुविधेचा तपशील |
|---|---|
| न.भू. क्र. १३१७ ते १३१९, १३३० आणि १३३१ व्हिलेज बांद्रा शेर्ली, बांद्रा (प.). | क्षेत्रफळ - २८६.२७ चौ. मी. (तळमजला) |

1) धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयात संस्था नोंदणी अधिनियम त्याचप्रमाणे मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम 1950 या दोन्ही अधिनियमानुसार मागील 5 वर्षांपासून नोंदणीकृत असावी.

२) अर्जदार संस्थेचा डबेवाला म्हणून सेवा देणा-या क्षेत्रातील कमीत कमी 03 वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे व त्यासंदर्भात कागदोपत्री पुराव्यासह नमूद करणे आवश्यक आहे. (जास्तीत जास्त अनुभव असलेल्या संस्थेस प्राधान्य देण्यात येईल)

3) संस्थेची मागील 3 वर्षाच्या कालावधीतील किमान वार्षिक उलाढाल रुपये 5 लाख असावी. तथापि सदर उलाढाल संस्थेच्या पुढील आर्थिक वर्षाच्या प्रस्तावित खर्चाच्या ५०% पेक्षा कमी नसावी. मागील ३ वर्षांच्या कालावधीकरिता सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेला ताळेबंद सोबत सादर करावा लागेल.

४) संस्थेच्या नावे स्वतंत्र पॅन क्रमांक (आयकराचा स्थायी खाते क्रमांक) असावा.

५) संस्था आयकर प्रपत्र सादर करणारी / करदाती असावी आणि मागील 3 वर्षाचे आयकर विवरणपत्र सादर करण्यात यावे.

६) इसारा रक्कम रु. 10,000/- पे ऑर्डर / डिमांड ड्राफ्ट च्या स्वरूपात महापालिकेस भरणा करण्यात यावी.

**पात्रतेकरिता विशेष अटी :**

1) समाजकल्याण केंद्र हे मुंबई परिक्षेत्रात डबेवाला म्हणून कार्य करणा-या संस्थेस वाटप करावयाचे असल्याने संस्थेकडे किमान २००० सभासद संख्या असणे आवश्यक आहे.

2) संस्थेच्या कार्यासंदर्भात संस्थेस पुरस्कार / प्रमाणपत्रे (राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरचे) असणे आवश्यक आहे.

तरी, सुलभ संदर्भाकरिता समाजकल्याण केंद्रांच्या वाटपाच्या धोरणाची प्रत मनपाच्या www.mcgm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

डबेवाला क्षेत्रात कार्य करणा-या पात्र संस्थांनी मंजुर धोरणानुसार लेखी स्वरुपात आवश्यक कागदपत्रांसह इच्छुक संस्थांनी आपले अर्ज दि. १७.०२.२०२२ पर्यंत दुपारी ०३.०० वाजेपर्यंत लेखी स्वरूपात सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) यांच्या कार्यालयामध्ये सादर करावेत. विहीत मुदतीत सादर न झालेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) यांचे कार्यालय
बृहन्मुंबई महानगरपालिका (मुख्य कार्यालय),
विस्तारित इमारत, 4था मजला,
फोर्ट, मुंबई - 400 001

सही/- १०.०२.२०२२
**कार्यकारी अभियंता (मालमत्ता)**